**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र  राज्य गॅझेटिअर**
**दर्शनिका (गॅझेटिअर) विभाग**

डॉ.अ.शं.पाठक
कार्यकारी संपादक व सचिव
दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन,
२७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.
दूरध्वनी : २२६७८७७९ / २२६९११२४
संकेत स्थळ : http//www.maharashtra.gov.in
ई-मेल : stategazetteer maharashtra@yahoo.co.in

**गॅझेटिअर विभाग, महाराष्ट्र शासन**

गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरुप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या परंपरा, राजघराण्यांचा इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश ही गॅझेटिअरची मूळ संकल्पना.

एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांनी आपल्या अधिका-यांना प्रशासनासाठी एतद्देशियांची माहिती पुरविणारा एक उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअरची निर्मिती केली.  आज समाजाभिमुख शासन ही संकल्पना आम्ही स्वीकारली आहे. या दृष्टीने विविध क्षेत्रातील विकासविषयक संकल्पनांचा आराखडा मांडताना सहाय्यभूत ठरणारा उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअर सर्वमान्य होत आहे.

या विभागाकडून मूलभूत अशी माहिती देणा-या प्रकाशविषयक ज्या मालिका कार्यान्वित आहेत त्यात जिल्हा व राज्य गॅझेटिअर यांची इंग्रजी व मराठी आवृत्ती, ब्रिटिशकालीन गॅझेटिअरचे पुनर्मुद्रित गंथ, जिल्हा पुरवणी गॅझेटिअर याशिवाय सोर्स मटेरिअल फॉर ए हिस्टरी ऑफ दि फ्रिडम मुव्हमेंट व स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश यांचा अंतर्भाव आहे.

दर्शनिका विभाग (गॅझेटिअर डिपार्टमेंट) हे एक स्वतंत्र संचालनालय असून ते महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. या विभागाकडून इंग्रजी व मराठी भाषांमधून जिल्हा गॅझेटिअर व राज्य गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित केले जातात.

## जिल्हानिहाय दर्शनिका

**विभागाच्या कामाचे स्वरुप --** गॅझेटिअर ग्रंथाच्या लेखनासाठी या विभागाला विस्तृत व सखोल ऐतिहासिक माहिती गोळा करावी लागते. ही माहिती विखुरलेले जुने अभिलेख, अहवाल, प्रकाशने, पत्रव्यवहार, व्यक्तिगत भेटी तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षणाव्दारे गोळा करण्यात येते. जमविलेल्या सर्व माहिती व आधार साहित्याचे वर्गीकरण, सुसूत्रीकरण व तपासणी करुन लेखन केले जाते. लेखन केलेल्या प्रकरणाची तपासणी व दुरुस्ती करुन अंतिम संपादन करण्यात येते. काही महत्त्वाच्या विषयांवर विव्दान तज्ञांकडूनही मानधन तत्त्वावर लेखन करुन घेण्यात येते. तथापि, बहुतेक लेखन या विभागातील अधिकारी व कर्मचारी करतात. अंतिम संपादनानंतर तयार झालेला सर्व मजकूर संपादक मंडळाच्या सभासदांकडे छाननी व सूचनांकरिता पाठविला जातो. यानंतर त्यास अंतिम स्वरुप देण्यात येते.

## इंग्रजी गॅझेटिअर

### (अ) जिल्हा गॅझेटिअर

इंग्रजीतून सुधारित जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ मालिकेचे काम सन १९४९ मध्ये हाती घेण्यात आले. यात सन १९६१ साली अस्तित्वात असलेल्या २६ जिल्हयांसाठीचे गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. या ग्रंथांसाठी केंद्र सरकारचे अनुदान प्राप्त झाले होते.

## जिल्हा गॅझेटिअरच्या सी. डी. आवृत्ती

या विभागाने पूर्व प्रकाशित गॅझेटिअरची सी. डी. प्रत उपलब्ध करुन देण्याविषयी योजना हाती घेतली असून या योजनेचा एक भाग म्हणून पुणे (१९५४), औरंगाबाद (१९७७), नाशिक (१९७५), नांदेड (१९७१) आणि नागपूर (१९६६) या जिल्हा गॅझेटिअर ग्रंथांच्या सी. डी. प्रत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. मागणी नोंदविल्यास या विभागाच्या वतीने त्यांचा पुरवठा करण्यात येईल. या सी. डी. शासनाच्या वेब साईटवरसुध्दा उपलब्ध असून संकेतांक http//www.maharashtra.gov.in असा आहे. या योजनेत लवकरच उस्मानाबाद, बीड, परभणी जिल्हा गॅझेटिअर सी. डी. उपलब्ध होतील.

## (ब) पुरवणी जिल्हा गॅझेटिअर (इंग्रजी)

केंद्र सरकारच्या सूचनेनुसार प्रकाशित झालेल्या इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर ग्रंथांच्या सुधारित आवृत्तीस दर दहा वर्षाच्या अंतराने अद्ययावत माहितीने परिपूर्ण अशी पुरवणी इंग्रजीतून प्रकाशित करण्याची योजना आहे. या योजनेत आतापर्यंत १० पुरवणी ग्रंथ प्रकाशित करण्यात आले असून सध्या ही योजना स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

## (क) ब्रिटिश कालखंडातील गॅझेटिअरचे पुनर्मुद्रण

ब्रिटिश आमदानीत १८४७ पासून गॅझेटिअर ग्रंथ लेखनास प्रारंभ होऊन शेवटचे गॅझेटिअर १९१३ मध्ये प्रकाशित झाले. भूतपूर्व मुंबई प्रांतातील गॅझेटिअर प्रकाशनास १८७४ ते १९१० इतका कालावधी लागला. तर विदर्भातील गॅझेटिअर १९०६ ते १९१३ दरम्यान प्रकाशित झाले. हैद्राबादच्या निझामी राजवटीतील मराठवाडयातील जिल्हयांपैकी फक्त औरंगाबाद जिल्हयाकरिताच सन १८८४ मध्ये गॅझेटिअर प्रकाशित करण्यात आले. या गॅझेटिअरचा अजूनही सुधारित आवृत्तीबरोबरच संदर्भ

ग्रंथ म्हणून अभ्यासक उपयोग करतात. या दुर्मिळ ग्रंथाचे पुनर्मुद्रण करण्याची योजना सुरु करण्यात आलेली आहे.

या मालिकेमध्ये मुंबई इलाख्यातचे १७ व मध्य प्रांत आणि व-हाडचे ८ ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

## (ड) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

जिल्हा गॅझेटिअर व्यतिरिक्त ज्या विषयांचे लेखन जिल्हा पातळीपेक्षा राज्य पातळीवर उत्तम होऊ शकते अशा विषयांसाठीराज्य गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करण्याची योजना आखण्यात आलेली आहे. यामुळे मूळ विषयावर अधिकृतपणे माहिती उपलब्ध होते. या मालिकेत इंग्रजी तसेच मराठी सुधारित आवृत्त्या दर्शनिका विभागाव्दारे प्रकाशित केल्या जातात. या योजनेनुसार आतापर्यंत इंग्रजीत ११ व मराठीत ५ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत.

### महाराष्ट्र राज्य दर्शनिका (मराठी)

| अनु.क्र. | राज्य गॅझेटिअरचे नाव | प्रकाशन वर्ष | किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र : भूमी व लोक | १९९६ | १७५.०० |
| २ | इतिहास : प्राचीन काळ (खंड-१) | २००२ | ३५०.०० |
| ३ | महाराष्ट्र : इतिहास : प्राचीन काळ-- स्थापत्य व कला (खंड-१, भाग-२) | २००२ | २७५.०० |
| ४ | औषधी वनस्पती | २००४ | १७५.०० |
| ५ | वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा | काम प्रगतीपथावर | . . . |

# मराठी दर्शनिका (गॅझेटिअर)

**जिल्हा गॅझेटिअर (मराठी) --** राज्य व जिल्हा गॅझेटिअरच्या इंग्रजीतून प्रकाशित करण्यात आलेल्या सुधारित आवृत्तीतील त्रुटी दूर करुन महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयासाठीएक असा अद्ययावत माहितीने परिपूर्ण जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ मराठीतून प्रकाशित करण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. महाराष्ट्रात विभागवार कोकण विभाग-६, नासिक-५, पुणे-५, औरंगाबाद-८, अमरावती-५ व नागपूर-६ असे एकूण ३५ जिल्हे आहेत. नवीन आकृतिबंधानुसार त्यांचे संपूर्ण पुनर्लेखन करण्यात येत आहे. यामध्ये जिल्हयाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यांचे विवेचन करुन भूगोल, लोक, अर्थव्यवस्था, प्रशासन, नियोजन व सामाजिक सेवा इत्यादी विषयांवर अधिक सखोल माहिती दिली आहे.

या मालिकेत पुढील ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

## जिल्हा गॅझेटिअर (मराठी)

| अनु.क्र. | राज्य गॅझेटिअरचे नाव | प्रकाशन वर्ष | किंमत |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| १ | परभणी जिल्हा गॅझेटिअर | १९८८ | ६५.०० |
| २ | कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर | १९८९ | २००.०० |
| ३ | वर्धा जिल्हा गॅझेटिअर | १९९२ | ९१.५० |
| ४ | रायगड जिहा गॅझेटिअर | १९९३ | २७५.०० |
| ५ | जळगाव जिल्हा गॅझेटिअर | १९९४ | २२५.०० |
| ६ | सातारा जिल्हा गॅझेटिअर | १९९९ | १९५.०० |
| ७ | नागपूर जिल्हा गॅझेटिअर (भाग-१) | २००५ | .. . . . |
| | नागपूर जिल्हा गॅझेटिअर (भाग-२) | २००५ | . . . . . |

## स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधार साहित्य प्रकाशन योजना

स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधार साहित्य प्रकाशन या योजनेखाली आधार साहित्याचे प्रकाशन या विभागाकडून करण्यात येत आहे. योजनेनुसार प्रकाशित करण्यात येत असलेल्या खंडांसाठी गोपनीय पोलीस अहवाल, शासकीय अभिलेखागारातील अभिलेख, जुन्या वृत्तपत्रांमधील उतारे यातून माहिती गोळा केली जाते. या आधार-साहित्य प्रकाशनामुळे गोपनीय शासकीय कागदपत्रांमधील अधिकृत माहिती इतिहास अभ्यासकांच्या समोर प्रथमच आली आहे. त्यामुळे स्वातंत्र्य लढयासंबंधी भारतीय अथवा परदेशी इतिहास संशोधकांना ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरते.

या योजने अंतर्गत १२ खंड प्रकाशित झाले आहेत.

## स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश

स्वातंत्र्य आंदोलनात ज्यांनी सक्रिय भाग घेतला, भूमिगत राहून काम केले व ज्यांनी हौतात्म्य पत्करले अशा महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांचे संक्षिप्त चरित्र, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोशात दिले असून ते इ.स. १९७० ते १९८० या कालावधीत, विदर्भ विभाग - २, मराठवाडा विभाग-१, पश्चिम विभाग-३ असे एकूण ६ खंड या मालिकेत प्रकाशित झाले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवरील www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर District Gazetteers या शीर्षाखाली विभागाच्या सर्व प्रकाशनांची माहिती उपलब्ध आहे.

विभागाच्या इंग्रजी प्रकाशनांची यादी व किंमत स्वतंत्रपणे इंग्रजी विभागात शासनाच्या याच संकेतस्थळावर दिलेली आहे.

---

**टीपः--** वरील सर्व प्रकाशने खालील शासकीय ग्रंथ भांडारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

१) शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.

२) शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार, पुणे ४११ ००१.

३) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१

४) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, औरंगाबाद ४२१ ००१.